कोविड-१९ मुळे राज्यात लावण्यात आलेल्या कडक निर्बंधाच्या पार्श्वभुमीवर राज्यातील अधीकृत फेरीवाले व पथविक्रेत्यांना रु. १५००/- ची अर्थिक सहाय्यता करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः- संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१५०/नवि-२०**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांकः- २९ एप्रिल,२०२१.

**प्रस्तावना :-**

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर एप्रिल २०२१ मध्ये कोविड-१९ च्या संसर्गाची साखळी तोडण्यासाठी राज्यात कडक निर्बंध लावण्यात आले आहेत. त्याअंतर्गत राज्यातील फेरीवाले व पथविक्रेते यांच्या व्यवसायावर देखील निर्बंध लावण्यात आले आहेत. यामुळे फेरीवाले व पथविक्रेते या दुर्बल घटकांच्या उपजिवीकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर बाब लक्षात घेता मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दि. १३/०४/२०२१ रोजी दुर्बल घटकांसाठी पॅकेज जाहीर केलेले आहे.याअंतर्गत राज्यातील सर्व अधिकृत पथविक्रेत्यांना रु. १५००/- ची अर्थिक मदत देण्याची देखील घोषणा करण्यात आलेली आहे.यानुसार राज्यातील फेरीवाले व पथविक्रेत्याना रु. १५००/- ची अर्थिक मदत देण्याची बाब शासनाच्या विराधीन होती.

**शासन निर्णय:-**

कोविड-१९ मुळे राज्यात लावण्यात आलेल्या कडक निर्बंधाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व अधीकृत पथविक्रेत्यांना रु. १५००/- ची सहाय्यता रक्कम देण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

०२. कोविड-१९ मुळे राज्यात लावण्यात आलेल्या कडक निर्बंधाच्या पार्श्वभूमीवर अधिकृत फेरीवाले व पथविक्रेते यांना प्रत्येकी रु.१५००/-याप्रमाणे अर्थिक मदत देण्यासाठी रु.६१.७५ कोटी (रुपये

एकसष्ट कोटी पंचाहत्तर लाख फक्त) इतका निधी सह आयुक्त तथा सह संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्याकडे वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

०३. उपरोक्त अर्थिक सहाय्यतेसाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी ह्या योजनेत अर्ज केलेल्या फेरीवाले व पथविक्रेत्यांना ग्राह्य धरले जाईल.

०४. राज्यातील PM-SVANIDHI मध्ये दि. १५/०४/२०२१ पर्यंत एकुण ४११७४५ पथविक्रेत्यांनी अर्ज केलेले आहेत. सदर लाभाचे पॅकेज दि १५/०४/२०२१ पर्यंत PM-SVANIDHI मध्ये अर्ज केलेल्या पथविक्रेत्यांना लागू करण्यात येईल.

०५. सदर निधी आहरीत करुन वितरीत करण्यासाठी सह आयुक्त तथा सह संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना नियंत्रक अधिकारी तसेच संबंधित सहाय्यक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०६. सदरचा निधी सर्व महानगरपालिकांना तसेच सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती यांना वितरीत करण्यात यावा. सदर निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

०७. सदरचा खर्च हा "मागणी क्र.एफ-३,२२३० कामगार व सेवायोजन, ०२, सेवायोजन सेवा,१०१, , सेवायोजन सेवा, (०३) शहरी रोजगार व उपजिविका कार्यक्रम, (०३) (०३) राज्य नागरी उपजिविका अभियान (राज्य योजनांतर्गत योजना) कार्यक्रम (२२३० ६०६५) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशिर्षांतर्गत सन २०२१-२०२२ या चालू वित्तीय वर्षाकरीता उपलब्ध असणाऱ्या तरतूदीमधून खर्ची घालण्यांत यावा.

०८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १६६/व्यय-३, दिनांक २६.०४.२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०४२८११४४१०४३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शंकर त्र्यं. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.

२) मा. मंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.

३) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव मंत्रालय,मुंबई.

४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

७) आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

८) महालेखापाल कार्यालय, (लेखापरीक्षा)) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

९) महालेखापाल कार्यालय,) (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

१०) संचालक, नगर रचना, पुणे

११) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई

१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१३) आयुक्त, सर्व महानगरपालिका

१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१५) सचिव (नवि-२) नगर विकास विभाग, यांचे स्वीय सहायक.

१६) निवडनस्ती नवि-२० कार्यासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.